सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/3084
दिनांक :- 08 OCT 2024

प्रति,

**समन्वयक तथा संचालक,**
राष्ट्रीय सेवा योजना,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती.
**समन्वयक तथा संचालक,**
**राष्ट्रीय सेवा योजना,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- रासेयो स्वयंसेवाकांनी युवकांच्या सहभागाने आणि पुढाकाराने जल संवर्धन (YEWS) अभियानातील उपक्रमाची अंमजबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :-** डॉ.निलेश पाठक, राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, रासेयो, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक रासेयो २०२४/प्र.क्र.६६/रासेयोकक्ष दिनांक १० सप्टेंबर २०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, रासेयो, महाराष्ट्र शासन यांचे रासेयो स्वयंसेवाकांनी युवकांच्या सहभागाने आणि पुढाकाराने जल संवर्धन (YEWS) अभियानातील उपक्रमाची अंमजबजावणी करण्या संदर्भाचे पत्र सोबत जोडलेले आहे कृपया त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(मनोज म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

मंत्रालयीन सेवा

# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-400 001.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com  दूरध्वनी क्र.022-22679565

**क्रमांक: रासेयो-202४/प्र.क्र.66/रासेयो कक्ष**  **दिनांक: 10 सप्टेंबर, 202४**

प्रति,

सर्व कार्यक्रम समन्वयक तथा संचालक
रासेयो संलग्नित विद्यापीठे/संचालनालये,

**विषय: रासेयो स्वयंसेवकांनी 'युवकांच्या सहभागाने आणि पुढाकाराने जल संवर्धन (YEWS)' अभियानातील उपक्रमांची अंमलबजावणी करणेबाबत**

**संदर्भ:** 1. रासेयो राज्य सल्लागार मंडळाचा वार्षिक कृती आराखड्याचा निर्णय
2. YEWS रोलआउट पत्र दि. 13.01.2023
3. यूजीसीचे जल संवर्धनाबाबतचे पत्र दि. 29 जुलै 2024
4. 02.07.2024, उच्च शिक्षण संचालक यांचे पत्र cum अध्यक्ष, YEWS राज्य सचिवालय
5. रासेयो संचालक आणि जिल्हा समन्वयकांचे ऑनलाइन मार्गदर्शन सत्र दि. 02.09.2024

महोदया/महोदय,

महाराष्ट्र शासन आणि युनिसेफ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांना जलवायू (क्लायमेट) साक्षरता आणि नैसर्गिक संसाधन संवर्धनाचे महत्व विशेषतः जल संवर्धन, जैवविविधता पुनर्संचय, इत्यादी विषयांवर कार्य करण्यासाठी सक्षम करण्यात येत आहे. जलवायू साक्षरता आणि कृती उपक्रमांतर्गत " युवकांच्या सहभागाने आणि पुढाकाराने जल संवर्धन " (YEWS) अभियान राबविले जात चालू आहे, ज्यामध्ये 15-29 वयोगटातील युवकांना जल संवर्धन उपक्रम शिकवण्याचे आणि कौशल्य प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे 28 दशलक्ष घनमीटर पाणी संरक्षित करण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानात कमी खर्चात, सहज करण्याजोग्या दैनंदिन पाणी बचतीच्या पद्धती अवलंबल्या जात आहेत. हा उपक्रम सध्या महाराष्ट्रातील 13 जिल्ह्यांतील (मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, बीड, जालना, ठाणे, सातारा, धाराशिव, संभाजीनगर, लातूर, अहमदनगर आणि पालघर) उच्च आणि तांत्रिक शिक्षण महाविद्यालयांमध्ये राबविला जात आहे.

राज्य सल्लागार मंडळाच्या वार्षिक कृती आराखड्यातील निर्णयाच्या आधारे आणि यूजीसीच्या जल संवर्धनाशी संबंधित पत्राचा संदर्भ देऊन YEWS कार्यक्रम रासेयोच्या वार्षिक कृती आराखड्यात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे आपल्या विद्यापीठातील प्रत्येक रासेयो युनिटने तात्काळ या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. यासाठी खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:

**1. रासेयो संचालक:**

- सर्व रासेयो समन्वयकांना व कार्यक्रम अधिकाऱ्यांना (POs) YEWS कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन व सहकार्य करणे
- सर्व रासेयो जिल्हा समन्वयक आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांना ऑनलाइन किंवा शक्य तिथे ऑफलाइन प्रशिक्षण देणे.

- राज्य संपर्क अधिकारी, रासेयो, मंत्रालय, मुंबई यांना मासिक प्रगती अहवाल सादर करणे.

**2. रासेयो जिल्हा समन्वयक:**

- YEWS कार्यक्रमाबाबत सर्व रासेयो अधिकाऱ्यांचे ऑनलाइन किंवा शक्य तिथे ऑफलाइन प्रशिक्षण आयोजित करणे.
- रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना सहकार्य करणे.
- मासिक प्रगती अहवाल संकलन करणे आणि विद्यापीठातील रासेयो संचालकांना पाठवणे (जोडपत्र/संलग्नक 1) .

**3. रासेयो कार्यक्रम अधिकारी:**

रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी स्वयंसेवकांना YEWS अभियानातील खालील उपक्रम पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करणे

- प्रत्येक रासेयो स्वयंसेवकाने जलवायू कृतीसाठी 'युवक नेतृत्व ' हा https://www.mahayouthnet.in/ येथे उपलब्ध असलेला ऑनलाइन स्व-गतीने शिकवला जाणारा कोर्स पूर्ण करणे
- प्रत्येक रासेयो स्वयंसेवकाने "व्हाय वेस्ट YEWS (Why Waste YEWS)"" ऍप डाउनलोड करून किमान 10,000 लिटरचे पाणी बचतीची नोंद करणे ग्रामीण महाराष्ट्रातील रासेयो लिडरशिप कॅम्पमध्ये सोक पिट व लीच पिट बांधकामाला प्रोत्साहन देणे. उदा. ग्रामीण विकास विभाग आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग राबवित असलेल्या स्वच्छ माझे अंगण उपक्रमांतर्गत शोष खड्डे, पाझर खड्डे, परसबाग बंदधणी उपक्रमांत युवक सहभागी होऊ शकतात. तसेच युवक MNREGA अंतर्गत शोष खड्डे आणि पाणी संवर्धनाच्या जाणीव जागृती उपक्रमांत सहभागी होऊ शकतात
- मासिक अहवाल रासेयो जिल्हा समन्वयक व संचालकांना पाठवणे (जोडपत्र/संलग्नक 2) .
- रासेयो युनिट स्तरावरील मासिक अहवाल संकलित करणे (जोडपत्र/संलग्नक 2.1).

विद्यापीठांना युनिसेफ आणि त्यांच्या सहयोगी संस्थांच्या सहकार्याने ऑनलाइन/ऑफलाइन क्षमता वृद्धी कार्यशाळांचे आयोजन करण्याची विनंती आहे.

**(डॉ. निलेश पाठक)**
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी
रासेयो, महाराष्ट्र शासन

**संलग्न:**

1. YEWS कार्यक्रम प्रशिक्षण पुस्तिका
2. YEWS कार्यक्रम पत्रक/अद्यतनित प्रगती अहवाल

**प्रत:**

1. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
2. क्षेत्रिय संचालक, रासेयो, पुणे
3. संचालक, उच्च शिक्षण
4. संचालक, तंत्र शिक्षण
5. सर्व विद्यापीठांचे कुलगुरू
6. श्री.बालाजी व्हरकट कार्यक्रम अधिकारी: पर्यावरण, जलवायू आणि आपत्ती जोखीम निवारण, युनिसेफ मुंबई
7. श्री. तानाजी पाटील, सल्लागार, युनिसेफ
8. श्रीमती. स्नेहा गौर, प्रकल्प अधिकारी, ग्रीन स्किलिंग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

Annexure 1: **Format for capturing district wise progress**

| Sr.No. | Particulars | Name/Numbers | Remarks/google drive link for images/videos/ news clippings |
|---|---|---|---|
| A. | Name of the University | | |
| B. | Name of the District | | |
| 1 | Total Number of NSS Units across the district/districts | | |
| 2 | Total Number of NSS Youth volunteers in the district | | |
| 3 | Total Number of NSS Youth Volunteers **enrolled** for the online course | | |
| 4 | Total Number of NSS Youth Volunteers **completed** the online course | | |
| 5 | Total Number of NSS Youth Volunteers enrolled on the Why Waste YEWS application | | |
| 6 | Total Amount of water saving reported by the NSS youth volunteers | | |
| 7 | Number of meetings/activities conducted for soak/leach pit construction promotion | | |

The NSS University level directors and District Coordinators can access the progress report shared by NSS POs here

https://tinyurl.com/NSSYEWS2024

**Annexure 2: Format for reporting NSS Unit level progress to district coordinator**

| Sr.No. | Particulars | Numbers | Remarks/google drive link for images/videos/news clippings |
|---|---|---|---|
| 1 | Total number of NSS Youth volunteers in the NSS Unit | | |
| 2 | Total Number of NSS Youth Volunteers **enrolled** for the online course | | |
| 3 | Total Number of NSS Youth Volunteers **completed** the online course | | |
| 4 | Total Number of NSS Youth Volunteers enrolled on the Why Waste YEWS application | | |
| 5 | Total Amount of water saving reported by the NSS youth volunteers | | |
| 6 | Number of meetings/activities conducted for soak/leach pit construction promotion | | |
| 7 | Any other activities in water conservation | | |

The NSS PO can fill the following template available at following Google form

https://forms.gle/eRBAvePP5KzxjHn79 or by scanning the QR code

**Annexure 2.1: Format for capturing information at NSS Unit level**

The suggestive format for NSS POs for capturing the NSS unit level data is;

1. Name of the Youth:
2. Youth Email ID:
3. Youth Mobile Number:
4. Youth Course enrollment status: Yes/No
5. Youth Course completion status: Yes/No
6. Youth Certificate no:
7. Why Waste YEWS application enrollment status:
8. How much water saving you have reported on the application (in liters):
9. How many meetings you conducted for soak pit/leach pit/kitchen garden/any other water conservation activities (in numbers):